# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टोरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय :- कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीचा अनुपालन अहवाल सादर करणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/पा.स./ 461 /सन 2024-25

फोर्ट, मुंबई - 400001 दिनांक:- 22.04.2024.

प्रति,

**शासकीय सहायक अभियोक्ता,**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई.**

**संदर्भ:-** 1. मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.87/2013 मधील दि. 25 जुलै 2016 रोजीचा न्यायनिर्णय.
2. शासन निर्णय क्र.एस-30/2013/प्र.क्र.479/भाग-1/फ-3, दि. 02.09.2016.
3. शासन निर्णय क्र. एस-30/2013/प्र.क्र.479/फ-3, दि.17.10.2016.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने, जनहित याचिका क्र. 87/2013 मधील दि.25 जुलै 2016 रोजीचा न्यायनिर्णयानुसार कोंकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानूसार सदर समितीच्या दरमहा बैठका घेतल्या जातात.

या अनुषंगाने कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीची दि.28.03.2024 रोजी 48 वी बैठक घेण्यात आली असून, सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणाद्वारे मा.उच्च न्यायालयात सादर करावे, ही विनंती.

**(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव)**
**सदस्य सचिव,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**प्रतिलिपी :-** अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना माहितीस्तव सविनय सादर.

# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६१४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 48 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/ 459 /सन 2024-25

फोर्ट, मुंबई 400 001 दिनांक: 22.04.2024.

**प्रति,**

1. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
2. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
3. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
4. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
   जिल्हा पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग.
5. मा. संचालक, पर्यावरण विभाग.
6. मा. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
7. मा. आयुक्त/ सहआयुक्त, महानगरपालिका (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपूर / उल्हासनगर.)
8. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
9. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
10. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
11. नगर रचना विभागाचे अधिकारी / शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको).
12. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

**संदर्भ** :- या कार्यालयाचे जा.क्र.कक्ष-1/पाणथळ/440/सन 2023-24 दि.14.03.2024 रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत प्रकरणी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 48 **वी** बैठक **गुरुवार** दिनांक 28.03.2024 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

**(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत:- बैठकीचे इतिवृत्त.**

# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६१४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या 48व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेबाबत.**

जा.क्र./ल. ले/457 /सन 2023-24

फोर्ट, मुंबई 400001 दिनांक- 16/04/2024

**प्रति,**

**मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग,**
**तथा अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती.**

**संदर्भ:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची दि.28.03.2024 रोजीची 48 वी बैठक.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भान्वये कोकण पाणथळ तक्रार निवारण **समितीची 48 वी बैठक दि.28.03.2024** रोजी आपले अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन मंजूरीसाठी पाठविण्यात येत आहे.

तरी, कोंकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजूरी मिळणेस विनंती आहे.

**(डॉ. शैलेंद्रकुमार जाधव)**
**सदस्य सचिव**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत:- बैठकीचे इतिवृत्त.**

## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 48 वी बैठक
## दिनांक 28.03.2024 रोजीचे बैठकीचे इतिवृत्त
## मा.विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची 48 वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीशः अथवा व्हि.सी.व्दारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | श्री. महेंद्र कल्याणकर | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| 2 | श्री. एस. व्ही. रामाराव (व्ही.सी.व्दारे) | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 3 | श्री. विवेक गायकवाड | उप आयुक्त (महसूल), कोकण विभाग | विभागीय आयुक्तांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| 4 | श्री. अभय पिंपळकर (व्ही.सी.द्वारे) | संचालक, पर्यावरण विभाग | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| 5 | श्री. उदय चंद्रकांत ढगे | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती, कांदळवन कक्ष, मुंबई (अतिरिक्त कार्यभार) | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 6 | श्री. विशाल मदने (व्ही.सी.द्वारे) | अवर सचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (कांदळवन प्रतिनिधी) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 7 | श्री. चंद्रकांत विभूते (व्ही.सी.द्वारे) | उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय विभाग (पाणथळ प्रतिनिधी ) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय (MCZMA) |
| 8 | श्री. दिपक खाडे (व्ही.सी.द्वारे) | विभागीय वन अधिकारी, चिपळूण | विभागीय वन अधिकारी, चिपळूण यांचे कार्यालय |
| 9 | श्री. रेवण लेंभे (व्ही.सी.द्वारे) | तहसिलदार (महसूल), ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| 10 | श्री. चंद्रकांत सूर्यवंशी (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय |
| 11 | श्री. मच्छिंद्र सुकटे (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे कार्यालय |
| 12 | श्री. सतीश बागल (व्ही.सी.द्वारे) | निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय |
| 13 | श्री. धनाजीराव धायगुडे | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | श्री. राहुल एकनाथ मुंडके | उपविभागीय अधिकारी, पनवेल रायगड | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांचे प्रतिनिधी |
| 15 | श्री. जितेंद्र जगदाळे | सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर | ठाणे आयुक्तालय |
| 16 | श्रीमती मनिषा प्रधान (व्ही.सी.द्वारे) | मुख्य पर्यावरण अधिकारी, ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| 17 | श्री. संजय कुमार समोट | उपअधिक्षक | उपनमक आयुक्त कार्यालय, वडाला |
| 18 | श्री. अनिकेत मानोरकर | अतिरिक्त आयुक्त | मिरा भाईंदर, महानगरपालिका |
| 19 | श्री. सुधीर निवृत्ती गवळी | पोलीस निरीक्षक, मिरा भाईंदर आयुक्तालय | मिरा भाईंदर वसई विरार आयुक्तालय |
| 20 | श्री. महेश हंबीरराव पाटील | पोलीस निरीक्षक, नेरुळ, पो.ठाणे, नवी मुंबई | परिमंडळ-1, नवी मुंबई |
| 21 | श्री. सुवर्णा जाधव | क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे |
| 22 | श्री. राघवेंद्र नामदेव पास्ते | प्रदुषण निरीक्षक (पर्यावरण विभाग), न.मु.म.पा. | पर्यावरण विभाग |
| 23 | श्री. अरुण र. भोर | सहायक पोलीस आयुक्त | पो.उप आयुक्त (अभियान), मुंबई |
| 24 | श्री. पी. बी. गोफणे | पोलीस उप अधिक्षक, रायगड | पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड |
| 25 | श्री. सुरेश अंकुश परब | सहा.आयुक्त | न.मु.म.पा. परि-1 |
| 26 | श्री. प्रविण हिंदूराव गोड | का.अभियंता | न.मु.म.पा. |
| 27 | डॉ. रेश्मा पाटोळे | शास्त्रज्ञ, BNHS | BNHS |
| 28 | श्री. सुमन कांबळे | अ./र.अ. | परि.2 |
| 29 | श्री. गणेश आघाव | प्र.अ.(न.मु.म.पा. प्रशासकीय अधिकारी) | परि.2 |
| 30 | श्री. सोमनाथ पोटरे | DMC | NMMC |
| 31 | श्री. संभाजी डी. शेलार | RMT | पनवेल |
| 32 | श्री. शैलेंन्द्र अ. मधुकर | AEE (Env.) | सिडको |
| 33 | श्री. स्टॅलिन डी. | संचालक, वनशक्ती | वनशक्ती |
| 34 | श्रीमती हेमा रमाणी (व्ही.सी.द्वारे) | प्रतिनिधी, बी.ई.ए.जी. | बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्शन ग्रुप |
| 35 | महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे कार्यालय (MHADA) | अनुपस्थित | |
| 36 | बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई शहर | अनुपस्थित | |
| 37 | वसई-विरार शहर महानगरपालिका, जिल्हा पालघर | अनुपस्थित | |

| अ. क्र | विषय | दिलेल्या सूचना |
| --- | --- | --- |
| 1 | विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या कार्यालयाकडून पाणथळ संरक्षण व संवर्धनाच्या अनुषंगाने श्री. स्टॅलीन डी. यांनी सादर केलेल्या निवेदनावर चर्चा करणेबाबत. | • The Hon`ble High court and Hon`ble Supreme Court have repeatedly held that all wetlands are protected till final notification as per the Wetland Rules 2010. The Wetland Atlas is a basic guide to understand where the wetlands tentatively lie in a district. The job of the state agencies is to identify the remaining wetlands so that they can be "notified" and protected.<br>• The issue of mangroves does not arise at all when the topic is about the issue of wetlands. Here we would like to add that all coastal wetlands are protected by CRZ laws and also by the orders of both the Hon`ble High Court and Hon`ble Supreme Court. The wetland Atlas shows coastal wetlands also so it has to be protected. The state agencies cannot decide for themselves that coastal wetlands cannot and need not be protected.<br>• Unless existing wetlands get "identified" how will they get "notified"?? The excuse of not protecting a site since it is not notified is being used to keep us running in circles and to facilitate the destruction of wetlands for vested interests. One last point we wish to request is to change the member Secretary of the committee. The Forest department is literally helpless in the issue of conserving wetlands. The Director -Environment Department should be made the secretary since Environment department has overreaching authority on the point of conservation of wetlands.<br>• **वरील मुद्यांबाबत बैठकीत चर्चा झाल्यानूसार Wetland Rule 2010 बाबत श्री. स्टॅलिन डी यांनी सदर Wetland Rule 2010 बाबत महत्त्वाचे मुद्दे सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** |

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | | **मुंबई शहर जिल्हयातील पाणथळ तक्रारी** | |
| 01 | **श्री. स्टॅलीन डी.**<br>**(WC- 73)**<br>Destruction of wetlands & near Bhakti Park Mono Rail station & nearby areas in Wadala.<br>दि. 31.01.2019. | • मा.अध्यक्ष यांनी उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढ़ील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश दिले होते.<br>• त्यानुसार, उप आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई यांच्या कार्यालयाचा दि.10.10.2023 रोजीचा प्राप्त अहवालात असे नमूद केले आहे की, SCO ने हॉर्मोज सॉल्ट वर्क्सच्या मीठ उत्पादकांवर आवश्यक कारवाई केली आहे. सॉल्ट उत्पादकांनी होर्मोझ सॉल्ट वर्क्स मधून C&D कचरा काढून टाकण्यास दि.14.06.2023 पासून सुरुवात केली असून आमचे अधिकारी व वॉच अँड वॉर्डचे कर्मचारी सॉल्ट पॅन विभागाच्या CS क्रमांक 145 मधून C&D कचरा काढण्याच्या कामावर नियमितपणे देखरेख ठेवत आहेत. कार्यालयातील नोंदीनुसार, दिनांक 21.06.2023 पर्यंत, सॉल्ट पॅन विभागाच्या CS क्रमांक 145 मधून मीठ उत्पादकांनी C&D कचऱ्याचे 20 डंपर काढले. CS No. 145 मधून मीठ उत्पादकांद्वारे C&D कचरा काढून टाकण्याच्या अत्यंत संथ गतीने चालू असलेली प्रक्रिया उक्त मीठ उत्पादकांना वारंवार सूचना देऊन साईट वरुन C&D कचरा जलद गतीने काढण्याबाबत सांगितले होते परंतु मीठ उत्पादक त्यात अयशस्वी झाले. मीठ उपअधीक्षक, वडाळा यांनी दि. 22.06.2023 रोजी मीठ उत्पादक यांचे विरुध्द वडाळा पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंद केली आहे आणि त्यानंतर FIR No. 144 of 2023 दाखल करण्यात आला आहे.<br>• मीठ उपअधीक्षक, वडाळा यांच्या सध्याच्या अहवालानूसार दि.22.06.2023 पासून मेसर्स होर्मोज सॉल्ट वर्क्सच्या बंधाऱ्यांमधून C&D कचरा उचलणे, वाहतूक करणे आणि त्यावर प्रक्रिया करण्यात आलेली नाही. C&D कचऱ्याच्या पुढील प्रक्रियेसाठी परवानगी मिळविण्यासाठी NMMC, वाशी येथे संपर्क साधला असता, त्यास परवानगी मिळाली परंतु, तो पर्यंत पावसाळा सुरु झाला आणि संततधार पाऊसामुळे उचल आणि वाहतूक प्रक्रिया ठप्प झाली. पावसाळयात माती चिखल होऊन जड वाहने अडकण्याचा धोका असतो. पावसाळा संपल्यानंतरच उचल आणि वाहतूक प्रक्रिया पुन्हा सुरु करता येईल. तुर्भे प्लांट मधील C&D कचऱ्याच्या पुढील पुर्नप्रक्रियेसाठी परवानगी मिळविण्यासाठी मीठ उत्पादकांना पुन्हा NMMC कडे संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे. परंतु परवानगी अद्याप प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी पोलिस आयुक्त, मुंबई यांना नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याच्या प्रगतीबाबतचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. | 1.उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई<br>2. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>3. पोलिस आयुक्त, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • या संदर्भात पोलीस उप आयुक्त, (अभियान) यांच्या दि.20.12.2023 रोजीच्या अहवालानुसार वडाळा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. 14/2023 कलम 188, 34 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमूद गुन्हयाच्या सद्यस्थिती अहवालानुसार नमुद गुन्हयाचे दोषारोपत्र तयार करण्यात आले असून मा.न्यायालयात सादर करीत असल्याचे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात मीठ अधिक्षक, मुंबई विभाग यांच्या दि.20.12.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर जागेवरी C&D कचरा काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे परंतु काढण्याची प्रक्रिया अत्यंत संथ आहे. मीठ उपअधीक्षक, वडाळा यांच्या अहवालानुसार, आजपर्यंत या सॉल्ट वर्क्समधून सुमारे 32 लॉरी C&D कचरा काढण्यात आला आहे.<br>• तसेच विहित कालावधीत माननीय NGT च्या आदेशाचे पालन करण्यात मीठ उत्पादक अयशस्वी ठरले असल्याने परिणामी मीठ विभागाने दि.04.08.2023 रोजी वडाळा पोलीस ठाण्यात 2023 चा FIR क्रमांक 144 दाखल केला आणि वडाळा पोलीस स्टेशनला पुढील आवश्यक कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे. तसेच सदर C&D कचरा टाकण्यासाठी मीठ विभाग जबाबदार नसून मीठ विभागामार्फत सदर ठिकाणी C&D कचरा टाकण्यासाठी मीठ उत्पादक किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणतीही प्रकारच्या परवानग्या दिलेल्या नाही. कचरा जनरेटर आणि MCGM सॉल्ट पॅन जमिनीत C&D कचरा टाकण्यासाठी पूर्णपणे जबाबदार असून त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.<br>• मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार कचरा जनरेटर आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांना उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार उपनमक आयुक्त कार्यालय, मुंबई आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी उचित कार्यवाही करुन पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• **मा. अध्यक्ष यांनी सदर तक्रार मीठ अधिक्षक, मुंबई विभाग यांच्या दि.20.12.2023 रोजीच्या अहवालाच्या अधिन राहून तक्रार निकाली काढण्याचे निर्देश दिले.** | |

| अ.क्र | तक्रार क्र. व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| **मुंबई उपनगर जिल्हयातील पाणथळ तक्रारी** | | | |
| 02 | **श्रीमती. प्रेरणा अशर**<br>**(WC-115)**<br>Distruction of Versova mangrove ecosystem.<br>दि. 07.03.2024. | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचे मार्फत दिनांक 21.03.2024 रोजीच्या पत्रान्वये स्थळपाहणी अहवाल संबंधित अधिकारी यांचेकडून मागविण्यात आला आहे.<br>• **सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाने तक्रारदारासमवेत स्थळपाहणी करुन समितीच्या पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करावा असे मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. बृहन्मुंबई महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| **ठाणे जिल्हयातील पाणथळ तक्रारी** | | | |
| 03 | **श्री. स्टॅलिन डी.**<br>(WC- 81)<br>Reclamation of Wetlands on the Left side of Kharigaon Toll Plaza as one drives from Thane to Kalyan.<br>Date - 20.01.2020. | • सदर तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिकेने वन विभाग यांचे कार्यालयाशी संपर्क करुन भराव उचलण्याची तात्काळ कार्यवाही करावी तसेच खाजगी जागेच्या जमिनीवर कांदळवनाचे नुकसान केल्यामुळे संबंधितांना नुकसान भरपाईबाबत नोटिसा जारी कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• त्यानुषंगाने, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्या कार्यालयाचा दि. 09.11.2023 रोजीच्या प्राप्त अहवालात तक्रार स्थळावरील एकूण बाधित जागेवरील डेब्रिज उचलण्याचा अंदाजखर्च तयार करण्यात आलेला असून रु.5,98,40,000/- (रुपये पाच कोटी अठ्याण्णव लाख चाळीस हजार मात्र) इतक्या कामाचा अंदाजखर्च नमूद केला आहे. सदर प्रकरणी ठाणे महानगरपालिकेकडे अर्थसंकल्पीय तरतूद वरील कामासाठी उपलब्ध नसल्याने जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे सदर प्रस्ताव अर्थ सहाय्यासाठी सादर करण्यात येणार असून, तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मा.आयुक्त सो. यांना दि. 08.11.2023 रोजीच्या मान्यतेने सादर करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे.<br>• त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांच्या दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने डेब्रिज काढण्याकरीताच्या कामाबाबत खारेगाव टोलनाक्यानजीकच्या तक्रारस्थळाची सर्व संबंधित विभागांद्वारे दि.०३/१०/२०२३ रोजी एकत्रित पाहणी करण्यात आली असून पाहणीवेळी, | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. ठाणे, महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्रारस्थळावरील कांदळवन व भरणीचे Geo tagged फोटो वनविभाग व ठामपाच्या अधिकाऱ्यांनी घेतले असून सद्यस्थितीत कांदळवनाला नुकसान न होण्याकरीता वन विभागाद्वारे भरणी काढण्याकरीता जागेचे सिमांकन सुरु असलेबाबत ठाणे महानगरपालिकेने दि.०६/१०/२०२३ रोजी अहवाल सादर केलेला आहे.<br>• तसेच खाजगी जागेच्या जमिनीवर कांदळवनाचे नुकसान केल्यामुळे श्री. नितीनकुमार कांतीलाल सोनावाला (सोनावाला ब्रदर्स) यांना ठाणे महानगरपालिकेमार्फत दि. ३१/१०/२०२३ रोजी नुकसान भरपाईची नोटिस निर्गमित करणेत आलेली आहे असे नमूद केले आहे.<br>• याबाबत, मा. अध्यक्ष यांनी ठाणे महानगरपालिकेने कांदळवन क्षेत्रातील माती भराव/डेब्रिज काढणेसाठी येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक शासनास सादर करुन अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबतच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.<br>• याबाबत तक्रारदार यांनी सदर ठिकाणी एक ट्रेंच काढण्यात आले असल्याचे सांगितले.<br>• याबाबत ठाणे महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीतील क्षेत्रात ट्रेंच काढण्याची कार्यवाही करावी व खाजगी क्षेत्रातील कांदळवन ऱ्हासाबाबत संबंधीत गुन्हेगारांकडून नुकसान भरपाई वसूल करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• त्याअनुषंगाने ठाणे महानगरपालिकेच्या दि.27.12.2023 रोजीच्या अहवालानुसार खारेगाव टोलनाक्यानजीक खाडी किनाऱ्यावर कांदळवन क्षेत्रातील डेब्रिजचा भराव काढणेच्या कामाकरिता ठाणे महानगरपालिकेस निधी उपलब्ध करणेकरीता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा.प्रधान सचिव (2), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करण्यात आल्याचे पत्र समितीस प्राप्त झाले आहे.<br>• मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार ठाणे, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनास सादर केलेल्या अहवालाच्या सद्यस्थितीबाबत पुढील बैठकीपूर्वी अहवाल समितीस सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी आचारसंहिता लागल्यामुळे सदर जागेवरील ट्रेंच काढण्याकरीता ठाणे महानगरपालिकेने मुख्य सचिवांच्या खालील छाननी समितीकडे नस्ती सादर करुन भारत निवडणूक आयोगाकडे मंजूरी प्राप्त करुन घेण्यास पाठविण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **दिले.**<br>• **तसेच कांदळवन क्षेत्रातील डेब्रिजचा भराव काढणेच्या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास सादर केलेल्या अंदाजत्रकास तातडीने मंजूरी मिळण्याकरिता ठाणे, महानगरपालिका यांनी पाठपुरावा करावा आणि समितीच्या पुढील बैठकीपूर्वी त्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 04 | **श्री. सुनील अगरवाल (WC- 92)**<br>Mangrove and Wetlands destruction near Hiranandani Estate Thane.<br>Date - 14.12.2019<br>(सदर तक्रार पाणथळ समितीकडे वर्ग झाली आहे) | • ठाणे महानगरपालिका यांचे कार्यालयाचा दि. १२ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या अहवालाचे अवलोकन केले असता, सदर जागा मौजे वडवली येथील स.नं. १०० या भूखंडाचे काही क्षेत्र नियोजित ४० मी. रुंद रस्त्याने बाधित होत असून, उर्वरित क्षेत्र हरित विभागात (मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार G-२ Zone) समाविष्ट आहे. तसेच हरित विभागातील काही भूखंडाच्या क्षेत्रावर नियोजित ३० मी. रुंद रस्त्या अंतर्गत मेट्रो कारशेड आरक्षण प्रस्तावित आहे. यामुळे स.न.१०० या भूखंडाचे काही क्षेत्र बाधित होत असून उप विभागीय अधिकारी, खारभूमी विकास उप विभाग, भिवंडी (कळवा) ठाणे यांचे कार्यालयाकडील दिनांक १३.०६.२०१२ रोजीच्या पत्रानूसार खारभूमी योजनेअंतर्गत पुन:प्रापित क्षेत्रातील भूखंडाचे यादीत मौजे वडवली येथील स.नं. १०० या भूखंडाचा समावेश आहे. तसेच, उपरोक्त भूखंडाचा वन विभागाचे यादीत समावेश नसून Eco Sensitive Zone, Metro Influence Zone व फ्लेमिंगोचे तरतुदीने सदर भूखंडाचे क्षेत्र बाधित नाही. त्याचप्रमाणे शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशास तसेच शासनाने मंजूर केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR - २०२०) मा. आयुक्त सो. यांनी नियम क्र. ३.११ मधील तरतूदीनुसार मान्य केलेल्या फेरबदलास अधिन राहून विषयांकित भूखंडाबाबत अभिप्राय देण्यात येत आहे. असे अहवालात नमूद केलेले आहे.<br>• जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या दि.०८.०९.२०२३ रोजीच्या अहवालानूसार सदरची तक्रार ही ठाणे महानगरपालिका यांचे अखत्यारितील असून ठाणे महानगरपालिका यांनी तक्रारीतील नमूद क्षेत्र हे पाणथळ क्षेत्र नसल्याचे नमूद केले आहे.<br>• २७.१२.२०२३ नुसार निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशांच्या प्रती किंवा वेटलँड ॲटलास नकाशे केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे | जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना अहवाल १५ दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांच्या दि.२२.११.२०२३ रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत तक्रार स्थळाचे अक्षांश व रेखांश चे मंजूर सुधारित विकास आराखड्यातील स्थान पाहता, सदर जागा मौ. वडवली येथील स.नं. १०० पै असून सदर भूखंडाचे काही क्षेत्र रस्त्याने बाधीत होत असून उर्वरित क्षेत्र हरित विभागात (ग्रीन झोन २) मध्ये समाविष्ट होत आहे. हरित विभागातल काही क्षेत्र हे मेट्रो कारशेड करीता आरक्षित करणेबाबत प्रस्तावित आहे. उपरोक्त भूखंडाचा वन विभागाचे यादीत समावेश होत नसून सदरचे क्षेत्र हे Eco Sensitive Zone, Metro Influence Zone व फ्लेमिंगोचे तरतुदीने बाधीत होत नाही असा अहवाल ठाणे महानगरपालिका यांनी दि. १२/०८/२०२१ व दि. ०६/१०/२०२३ अन्वये समितीस सादर केलेला आहे असे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना सदरचे क्षेत्र MRSAC / CRZ मॅप नुसार पाणथळ क्षेत्र आहे किंवा कसे याबाबत तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल ८ दिवसात समितीस सादर करण्याच्या सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना अहवाल ७ दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• ठाणे महानगरपालिका यांचे दि.29.01.2024 रोजीच्या अहवालानूसार सदरचे ठिकाण MRSAC नकाशाच्या बाहेर असल्याचे दिसून येते. तसेच तक्रारीतील नमुद क्षेत्र सर्व्हे क्र.100 हे कांदळवन क्षेत्र नसल्याचे पत्रामध्ये नमुद केले आहे.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयाने CRZ, MRSAC आणि Wetland Atlas यांच्याआधारे तुलना करुन सदरचे क्षेत्र पाणथळ आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल ८ दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |

| | | | |
|---|---|---|---|
| 05 | 1) **श्री. सुनील अगरवाल.** (WC- 96)<br>Violation of CRZ rules & Indian Wildlife Protection Act in Sector 60, Nerul Navi, Mumbai.<br>दि. 24.09.2022.<br>2) **श्रीमती कांचन पुरोहित** - Wetland of NRI, Sector 60, Nerul, Navi Mumbai, Water inlet blockage.<br>दि. 06.11.2023. | • उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार सदर जागा खाजगी व्यक्तीस सुपूर्द करण्यात आलेली असल्याचे सांगितले.<br>• या प्रकरणी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना उपअधीक्षक ट्रॉम्बे, मीठागरे विभाग यांचेशी समन्वय साधून तक्रारीतील नमूद जागा सर्व्हे क्रमांकानूसार मीठागरे विभागाच्या अखत्यारीत येते अथवा नाही याची तपासणी करुन त्याबाबतचा लेखी अहवाल मीठागरे विभागाकडून प्राप्त करुन घ्यावा तसेच सदर जागा मीठागरे विभागाच्या अखत्यारीत नसल्यास तहसीलदार, ठाणे यांना सूचना (Guideline) देऊन समितीचे अशासकीय सदस्य श्री.स्टॅलीन डी. यांचे सोबत सदर बांध मोकळे करण्याचे आदेश द्यावेत असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले होते.<br>• त्यानुषंगाने, उप आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई यांचे दि.10.10.2023 रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयातील नोंदीनुसार, ठाणे खाडीजवळ (ठाणे शहरात) मीठ विभागाच्या मालकीची कोणतीही जमीन नाही. मीठ उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक C.No.4/Salt/83/976 दिनांक 13.09.2023 अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना जेथे कांदळवनाचा नाश झाल्याची नोंद करण्यात आली आहे अशा जमिनींचा सर्व्हे नंबर देण्याबाबत विनंती केली आहे. परंतु जमिनीचा तपशील अद्यापही त्यांचे कार्यालयास अप्राप्त असल्याचे नमूद केले आहे.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे यांच्या दि.22.11.2023 रोजीच्या अहवालानुसार सदर तक्रारीबाबत उप अधीक्षक ट्रॉम्बे, मीठागारे विभाग यांचेशी समन्वय साधून तक्रारीतील नमूद जागा ही मीठागारे विभागाच्या अखत्यारीत येते अथवा नाही याची तपासणी करुन त्याबाबतचा लेखी अहवाल मीठागारे विभागाकडून घेण्याबाबत तसेच सदर जागा मीठागारे विभागाच्या अखत्यारीत नसल्यास समितीचे अशासकीय सदस्य श्री. स्टॅलीन डी यांचे सोबत सदर बांध मोकळे करणेबाबत या कार्यालयामार्फ़त तहसीलदार, ठाणे यांना सूचना देण्यात आल्याचे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात मीठ अधिक्षक, मुंबई विभाग यांच्या दि.20.12.2023 रोजीच्या अहवालानुसार या कार्यालयातील नोंदीनुसार, ठाणे खाडीजवळ (ठाणे शहरात) मीठ विभागाच्या मालकीची कोणतीही जमीन नाही. सॉल्ट ट्रॉम्बेचे उप अधीक्षक त्यांच्या कार्यालयीन पत्र क्र. C. क्र. 4/मीठ/83/976 दिनांक 13.09.2023 रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांना खारफुटीचा नाश झाल्याची | 1. जिल्हाधिकारी, ठाणे<br>2. आयुक्त, मीठागरे विभाग<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोंद असलेल्या जमिनीचे सर्वेक्षण क्रमांक उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती परंतु ती अद्याप जिल्हाधिका-यांकडून प्राप्त झालेली नाही. दि.5.12.2023 रोजी जिल्हाधिकारी, ठाणे येथे झालेल्या बैठकीत या विषयावर अधिक चर्चा करण्यात आली. त्यामुळे पुढील विषयसूचीमधून हा विषय वगळण्यात यावा असे नमूद केले आहे.<br>• तसेच करावे, नेरुळ येथील सर्व्हे क्रमांक 264, 265 जेथे खारफुटीचा नाश झाल्याची नोंद झाली होती, ती आता मीठ विभागाच्या ताब्यात नाही, ही जमीन SLAO ने फार पूर्वी संपादित केली होती आणि सध्या ती जमीन त्यांच्याकडे आहे. जिल्हाधिकारी, ठाणे येथे झालेल्या बैठकीदरम्यान, प्रतिनिधी, मीठ उपअधीक्षक, ट्रॉम्बे यांनी जिल्हाधिका-यांना अवगत करून त्यांच्या नोंदींची पडताळणी करण्याची विनंती केली होती. त्यानुसार आरडीसी श्री सुदाम परदेशी यांनी संबंधित अधिकाऱ्याला याची पडताळणी करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे पुढील विषयसूचीमधून हा विषय वगळण्यात यावा असे नमूद केले आहे.<br>• याबाबत, निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे व उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी या दोन्ही तक्रारींची जागा एकच असून तहसिलदार ठाणे यांचेमार्फत सदर ठिकाणी असलेले बांध मोकळे करण्यात आले असल्याचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने मा.अध्यक्ष यांनी सदर जागेवर केलेल्या कार्यवाहीची छायाचित्रे समितीस उपलब्ध करुन देण्याच्या सूचना निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे यांना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाचे तहसिलदार, ठाणे यांनी सदर तक्रारीबाबत कार्यवाही पूर्ण झाली असून त्याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्यात आले नसल्याचे सांगितले.**<br>• **त्यानुषंगाने, सदर जागेवर केलेल्या कार्यवाहीची छायाचित्रे समितीस पाठविल्यानंतर सदर तक्रार निकाली काढण्यात यावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले.** | |
| 06 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>(WC- 102) Blockage of tide water by CIDCO in Survey Number 265 Nerul. **दि.** 08.10.2022. | • सिडको कार्यालयाच्या दि.17.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर जागेवर काही स्थानिक मच्छीमार समाजातील लोकांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याची भरती व आहोटी दरम्यान संचालन करत असल्याचे निदर्शनास आले. यात त्यांचा मच्छीमारांचा हेतू असल्याचे आढळून येत असून या ठिकाणी सिडको ने भू-विकासाचे कुठलेही कार्य हाती घेण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या अहवालाच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते. | नवी मुंबई, महानगरपालिका |
| 07 | **श्रीमती श्रुती अग्रवाल**<br>दि. 28.02.2023 **व**<br>**श्री. स्टॅलिन डी.** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | **दि.** 01.03.2023 (WC-105)<br>1. Blockage of water in the wetlands behind NRI complex.<br>**श्री. प्रदीप पाटोले दि.**16.05.2023.<br>1. NRI complex Survey No.22 a huge Mangrove patch is in possession of CIDCO. | • या प्रकरणी नवी मुंबई, महानगरपालिका यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• त्या अनुषंगाने नोडल अधिकारी तथा उप आयुक्त, (परि-1) नवी मुंबई महानगरपालिका यांच्या दि.23.11.2023 रोजीच्या अहलवालानुसार सदर जागेची दि.23.11.2023 रोजी स्थळ पाहणी केली असता तथील रहीवाशी मच्छीमार बांधाव यांनी लाकडी झडपे लावून समुद्राच्या पाण्याचे एका विशिष्ठ काळात भरती आहोटी नियंत्रण करुन त्याच्या उदर निर्वाहासाठी मच्छिमारीचे कार्य पूर्वपिढी पासून केली जाते असे दिसून आले. सदरचे क्षेत्र सॉल्ट विभागाचे / सिडको यांचे अखत्यारीत येत आहे. या बाबत दि.17.07.2023 रोजी सिडको यांनी दिलेल्या अहवालानुसार भु-विकासाचे कोणतेही काम होत नसून यात कांदळवनाची कोणतीही हानी/ऱ्हास होत नाही असे नमूद केले आहे.<br>• या तक्रारी संदर्भात उप आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी स्थळ पाहणी केली असून सदर ठिकाणचा रस्ता हा ४० वर्षापासून जुना रस्ता असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे सदर ठिकाणी पूर्वीपासून उदरनिर्वाहासाठी मच्छिमारी केली जात असल्याचे उप आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी सांगितले.<br>• वरीलबाबत सदरची जागा कोणाची आहे हे तपासण्याच्या सूचना मा.अध्यक्ष यांनी तहसिलदार ठाणे यांना दिल्या होत्या.<br>• याबाबत, मा. अध्यक्ष यांनी सदर ठिकाणी तहसिलदार ठाणे व नवी मुंबई महानगरपालिका यांना श्री. स्टॅलिन डी. यांच्या सोबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन संबंधित जागेच्या छायाचित्रांसहीत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या.<br>• या प्रकरणी तहसिलदार, ठाणे यांना कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **मा.अध्यक्ष यांनी सदर तक्रारीसंदर्भात श्री. स्टॅलिन डी, अशासकीय सदस्य यांना रहिवाशी मच्छीमार बांधाव व फ़्लेमिंगो यांचा अधिवास या दोघांच्या उपाययोजनांबाबतचा अहवाल सादर करण्यास सांगितले व तो अहवाल नवी मुंबई, महानगरपालिका, सिडको आणि संचालक, पर्यावरण विभाग यांचेकडे पाठवून समितीच्या पुढील बैठकीपूर्वी त्यांचे अभिप्राय घेण्याबाबत बैठकीत सूचना दिल्या.** | |
| 08 | **श्रीमती श्रुती अग्रवाल**<br>(WC-112)<br>Regarding Construction | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 15.09.2023 रोजीच्या पत्रान्वये संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. तथापि, अहवाल अप्राप्त आहे. | 1.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका<br>2.सह-व्यवस्थापकीय संचालक, |

| | | | |
|---|---|---|---|
| | happening in sector 58 near NRI complex **दि**.13.09.2023. | • या प्रकरणी संबंधितांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदरची जागा सिडको विभागाच्या अखत्यारीत असून सेक्टर ५८ येथील काम हे सिडको विभागाच्या परवानग्या घेऊन करण्यात येत असल्याचे सांगितले.<br>• याबाबत, सिडको यांच्या प्रतिनिधी यांना याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी ठाणे व समितीस सादर करण्याच्या सचूना मा.अध्यक्ष यांनी दिल्या होत्या.<br>• **सदर प्रकरणी, सिडको यांच्या प्रतिनिधी यांना याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, ठाणे व समितीस सादर करण्याच्या पुनश्चः सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या.** | सिडको<br>3.जिल्हाधिकारी, ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| **रायगड जिल्हयातील पाणथळ तक्रारी** | | | |
| 09 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>**(WC- 100)**<br>Wetlands already eliminated in defiance of court orders to protect and ones that are presently being destroyed.<br>दि. 12.07.2022. | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजी संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधीं सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 2 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |
| 10 | **श्री. स्टॅलिन डी –**<br>**(WC- 101)**<br>Please Stop Reclamation and destruction of belpada Wetland.<br>दि. 28.09.2022 | • सदर तक्रारीबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांना पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• त्यानुषंगाने, जिल्हाधिकारी, रायगड यांचा कार्यालयाचा दिनांक 08 नोव्हेंबर, 2023 रोजीच्या प्राप्त अहवालात, मौजे जासई येथील स.नं. 41,48,47 मध्ये डेब्रीजचा भराव टाकण्यात आलेला असून सदर जागेत RMC Plant सुरु आहे. याबाबत लवकरच कारवाई करण्यात येईल असे सिडकोचे प्रतिनिधी श्री.जगदीश पाटील यांनी सांगितले तसेच, श्री अनिरुध्द महादेव ठाकूर व इतर यांनी स.नं. 41/6 मध्ये 18 वर्षापूर्वी मातीचा भराव केलेला असून सदर जागा ही खाजगी व्यक्तीच्या नावे | जिल्हाधिकारी, रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहे आणि सदरची जमिन अधिसूचित पाणथळ नसून ऱ्हास झाला आहे असे म्हणता येणार नाही असे नमूद केले आहे.<br>• याबाबत, मा. अध्यक्ष यांनी सदर तक्रार समितीच्या पुढील बैठकीत चर्चेकरिता घेण्याचे निर्देश दिले होते.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 11 | **श्री.बी.एन.कुमार (WC-106)**<br>NMSEZ IT Hub on Mangrove-wetland graves-Request to stop it.<br>दि. 08.03.2023 | • निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व तक्रारींकरीता संयुक्त स्थळपाहणी शुक्रवार, दि.15.09.2023 रोजीक्र संचालक, पर्यावरण विभाग व सिडको यांचे प्रतिनिधी सोबत ठेवण्यात आली असल्याचे नमूद करुन त्यापुढच्या आठवडयातील गुरुवार, दि.21.09.2023 रोजी जिल्हाधिकारी रायगड यांनी पाचही तक्रारींच्या स्थळपाहणी संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिलेले असून तद्नंतर समितीकडे अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, रायगड यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. जिल्हाधिकारी, रायगड<br>2. सह-व्यवस्थापकीय संचालक, सिडको<br>3. संचालक, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **पालघर जिल्हयातील पाणथळ तक्रारी** | |
| 12 | **श्री. दामोदर शिंगडा**<br>(WC-86)<br>वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ मधील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ जागेतील तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत.<br>दि. 26.12.2022 | • वसई विरार शहर महानगरपालिका यांचे दि.13.07.2023 रोजीच्या अहवालानूसार गाव-मौजे धोवली, स.नं.109 ते 115 या जमिनीवर दि.17.12.2020 रोजी तालुका स्तरीय कांदळवन समिती यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान झाल्याचे दिसून आलेले नाही. तसेच माहे जानेवारी 2013 मध्ये उक्त स.नं.109 या जमिनीवर भराव होऊन कांदळवनाचे नुकसान झाल्या प्रकरणी वसई पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजी नंबर-02/2013 दि.12.01.2013 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमूद केले आहे.<br>• सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• त्यानुषंगाने, निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या. | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 13 | **श्री. निलेश विनायक जोशी (WC- 95)**<br>पालघर जिल्हयातील वसई तालुक्यातील, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती एच येथील दिवाणमान परिसरातील CRZ Area - No Development Zone मधील बांधकाम अनधिकृत यादीत नसल्याबाबतची तक्रार.<br>दि. 21.12.2021 | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले.<br>• त्यानुषंगाने, निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या..** | 1. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई<br>2. जिल्हाधिकारी, पालघर |
| 14 | **श्री.दिपक बारीया (WC-107)**<br>तत्कालीन वसई तहसिलदार यांनी "पाणथळ तक्रार निवारण समिती" यांना सादर केलेले खोटे अहवाल व आरोपीत इसमासोबत स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संगनमत करुन शासकीय कर्तव्य बजावण्यात केलेला कसूर ह्या बाबत.<br>दि. 26.03.2023 | • जिल्हाधिकारी पालघर यांचे दि.28.07.2023 रोजीच्या अहवालानूसार, सदर तक्रारी संदर्भात दिनांक 04.07.2023 रोजी स्थळ पहाणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी पाणथळाचा तसेच कांदळवनाचे ऱ्हास / नुकसान झालेले नसून कोणत्याही प्रकारचा भराव केल्याचे दिसून आलेले नसल्याचे नमूद केले आहे.<br>• त्यानुषंगाने, निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना सदर तक्रारीबाबतचे पूरक दस्तऐवज (Technical Support Document) जसे MRSAC नकाशे किंवा वेटलँड ॲटलास नकाशांच्या प्रती केलेल्या कार्यवाहीच्या अहवाल सोबत जोडून पुढील बैठकीपूर्वी समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | जिल्हाधिकारी, पालघर |
| 15 | **श्री.फ्रान्सिस डिसोजा (WC-108)**<br>भुईगाव खुर्द व बुद्रुक हद्दीतील | • सदर तक्रारीच्या चर्चे दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांनी स्थळपाहणीचे नियोजन करण्यात आले असल्याचे सांगितले असून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस पाठविण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| | सरकारी मालकीच्या सर्व्हे नं.164 या पाणथळ खार जमिनीवर बेकायदा भराव व बेकायदा रस्त्याचे बांधकाम करीत असलेल्या गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करुन कारवाई करणेबाबत.<br>दि. 31.03.2023 | • त्याअनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील बैठकीपूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याचे निर्देश मा.अध्यक्ष यांनी दिले होते.<br>• या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | |
| 16 | **श्री.मॅकेन्झी डाबरे**<br>**(WC-113)**<br>पाणथळ तक्रार निवारण समितीच्या जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिका-यांच्या कर्तव्यपूर्तीचे मूल्यमापन होणेबाबत तसेच पाणथळ क्षेत्र संरक्षणात कसुरी करणारे प्रांताधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई होणेबाबत.<br>दि. 16.10.2023 | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 08.11.2023 रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही अहवाल संबंधित यंत्रणेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे.<br>• या प्रकरणी संबंधितांना आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. वसई विरार शहर, महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, पालघर |
| 17 | **श्री. अनिकेत सतीस वाडीलकर**<br>**(WC-114)**<br>मौजे आगाशी येथील सर्वे क्रमांक 233/1 अ या पाणथळ जागेत झालेला मातीचा भराव हटवण्याबाबत व तिवरांच्या झाडांची पुन्हा लागवड करण्याबाबत.<br>दि. 03.11.2023 | • या प्रकरणी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानूसार सदस्य सचिव तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत दिनांक 08.11.2023 रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही अहवाल संबंधित यंत्रणेकडून मागविण्यात आला होता. तथापी, अहवाल अप्राप्त आहे.<br>• या प्रकरणी संबंधितांना आवश्यक कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या होत्या.<br>• **या प्रकरणी जिल्हाधिकारी, पालघर यांनी CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल 15 दिवसात समितीस सादर करण्याबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.** | 1. वसई विरार शहर महानगरपालिका<br>2. जिल्हाधिकारी, पालघर<br>3. उपवनसंरक्षक, डहाणू वन विभाग, डहाणू |

| 48th Konkan Wetland Grievance Redressal Committee Meeting Review Chart of Total Complaints Received | | | | |
|---|---|---|---|---|
| District | Total No of Complaint in 48th Meeting | Total No of Reports Received Till 48th Meeting | Total No of Resolved Complaints in 48th Meeting | Pending Complaints in 48th Meeting |
| Mumbai City | 1 | 1 | 1 | 0 |
| Mumbai Suburban | 1 | 2 | 0 | 1 |
| Thane | 6 | 6 | 1 | 5 |
| Palghar | 6 | 2 | 0 | 6 |
| Raigad | 3 | 5 | 0 | 3 |
| Ratnagiri | 0 | 0 | 0 | 0 |
| Sindhugurg | 0 | 0 | 0 | 0 |
| Total | 17 | 16 | 2 | 15 |

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती,
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग